# ECHO OF HIS CALL

ECHO OF HIS CALL
REACHING NATIONS
SINCE 1969
1969 TO 2029

## बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

India's National Spiritual Newspaper

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHAUL BENJAMIN SHINDE

VOL: XXVII    YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, 2025 DECEMBER    No. 11


### पवित्र शास्त्र

कृपया हा शास्त्र भाग पाठ करा

**यशया ९:२-६**

२. जे लोक अंधारात चालत होते त्यांनी मोठा प्रकाश पाहिला आहे, जे मृत्युछायेच्या देशात राहत होते त्यांच्यावर उजेड प्रकाशाला आहे.

३. तू राष्ट्र बहुतपट केले आहे, तू त्यांचा हर्ष वाढवला आहे, कापणीच्या वेळेच्या हर्षाप्रमाणे, जसे लोक लूट वाटून घेताना उल्लासतात तसे ते तुझ्यासमोर हर्ष करीत आहेत.

४. कारण मिद्यानाच्या दिवशी झाले तसे तू त्याच्या भाराचे जोखड, त्याच्या खांद्यावरची काठी, त्याच्यावर जुलूम करणाऱ्याचा सोटा, ही मोडली आहेस.

५. कारण युद्धाच्या गर्दीत कवच घातलेल्या माणसाचे सर्व कवच, आणि रक्तात लोळवलेली वस्त्रे अग्नीत जाळण्यासाठी सरपण अशी होतील.

६. कारण आम्हांसाठी बाळ जन्मला आहे, आम्हांसाठी पुत्र दिला आहे, आणि राज्याधिकार त्याच्या खांद्यावर राहील. आणि त्याचे नाव अद्भुत, मंत्री, पराक्रमी देव, सनातन पिता, शांतीचा अधिपती असे म्हटले जाईल.

# खरा प्रकाश येशू ख्रिस्त तुमचा अंधार दूर करील!

## THE TRUE LIGHT JESUS CHRIST WILL REMOVE YOUR DARKNESS!

*Sis. Angel*



आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावाने, आमच्या एको ऑफ हिज कॉलच्या सर्व विस्तारित कुटुंबाला ख्रिसमसच्या शुभेच्छा!

आपण ख्रिसमस साजरा करावा की नाही, तसेच येशू ख्रिस्ताचा जन्म खरोखर २५ डिसेंबर रोजी झाला होता का यावर बरेच लोक वादविवाद करतात. तथापि, आपले लक्ष त्या वादविवादावर असू नये. हे निर्विवाद सत्य आहे की, त्याचा जन्म झाला; देव या जगात बाळाच्या रूपात आला; समस्त मनुष्यजातीच्या तारणासाठी मरावयास तो आला. चला तर, या उत्सवाचा उपयोग आपण येशू ख्रिस्त हाच या उत्सवाचे खरे कारण आहे याची घोषणा करण्यासाठी मिळालेली संधी असा करूया.

ख्रिसमस म्हणजे खरेदी, सजावट, सांताक्लॉज किंवा सणाची परंपरा नाही. तर, तो येशू ख्रिस्ताच्या जन्माचा खरा उद्देश्य प्रकट करण्याचा आणि इतरांशी सामायिक करण्याचा दिवस आहे:

(...पान ३ वर)




एको ऑफ हिज कॉल

यू ट्युब ख्रिश्चन चॅनल !

पास्टर सॅम सेल्वा राज यांच्या सोबत प्रार्थनेत सहभागी होण्याची संधी

पाच मिनिटांचा संदेश

इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु

प्रतिदिनी - पहाटे २.०० वाजल्या पासून

रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी

✻ कृपा करुन सबक्राईब करा ✻

ECHO OF HIS CALL REACHING NATIONS SINCE 1969

1969 TO 2029

# ECHO OF HIS CALL - (Marching towards 60th year)

Estd. 1969



## तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...



"परंतु काळाची पूर्णता झाली, तेव्हा देवाने आपला पुत्र, स्त्री पासून झालेला, नियमशास्त्राच्या स्वाधीन झालेला, असा पाठवला" - गलती ४:४



### आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.

प्रभूमधील माझ्या प्रियांनो,

देवाच्या कृपेने आपण या वर्षाच्या शेवटच्या महिन्यात प्रवेश केला आहे. ज्या प्रभूने आपल्या सेवाकार्यात सतत आपले रक्षण केले, मार्गदर्शन केले आणि बळ दिले, तो प्रभू चांगला आहे आणि आपल्या सर्व स्तुतीस पात्र आहे.

आपल्या मंडळीचे वडील, **एको ऑफ हिज कॉलचे** कर्मचारी, **नहेम्या बायबल कॉलेजेसचे** शिक्षकवर्ग, **सेंट पॉल्स मॅट्रिक्युलेशन स्कूल** आणि **प्रिंटिंग प्रेसची** टीम हे सर्व



*मुख्य मंडळीतील युवक सेवा कार्याचे प्रमुख नेते.*

येत्या वर्षात आमच्या सेवाकार्याचा विस्तार करण्यासाठी प्रार्थनापूर्वक आणि मनापासून योजना आखत आहेत.

**सेंट पॉल्स मॅट्रिक्युलेशन स्कूलमध्ये** शिक्षण घेणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना शारीरिक अडचणी किंवा इतर कठीण परिस्थितींना सामोरे जावे लागते. त्यांची पार्श्वभूमी समजल्यावर अनेकदा मन हेलावून जाते. मात्र, आमचे शिक्षक अत्यंत आपुलकीने आणि बांधिलकीने त्यांना शिकवत राहतात, त्यांचे संगोपन करतात आणि अतिशय निष्ठेने त्यांची काळजी घेतात.



***Speech by Sister Dr. Renuka on Children's Day at our St. Paul's Matriculation School***

आमचे मंडळीतील सेवकगण प्रामाणिक भक्तिभावाने प्रभूची विश्वासपूर्वक सेवा करीत आहेत. विशेषतः, आमच्या महिलांची प्रार्थना टीम, पुरुषांची प्रार्थना टीम, रात्रीची प्रार्थना करणारी टीम, उपवास व प्रार्थना करणारी टीम, संडे स्कूलच्या शिक्षकांची टीम, यूट्यूबद्वारे सेवा करणारी टीम,

HON. EDITOR-IN-CHIEF
Rev. Dr. Angeline S. Kumari, M.A., M.Sc., M.Ed.
EX MANAGING EDITOR
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.
GENERAL MANAGER
Bro. N. Prakasam, M.A., M.Sc.(C&P), PGDHRM, MBA.
ADMINISTRATION
Sis. Jesy Veena Sam
Adv. K. Puratchivendan, M.Com., C.A., B.L.
Dr. P.E.R. Premchand, M.Sc., M.A., M.Ed., Ph.D.
Dr. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM), Ph.D.
Dr. Rabinder Boaz, M.S. (CMC)
EDITORIAL BOARD
Dr. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Sis. Sajini Cherian
Rev. Dr. K.R. Rajasekaran
Rev. Dr. William Robert, Ph.D., DD, D.Lit.
EDITOR, PUBLISHER & PRINTER

Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 98412 71858 95661 31858
E.MAIL
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in
WEBSITES
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.org
YOUTUBE CHANNEL
Echo of His Call

Our Ministries: ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) ▢ BIBLECOR - Postal Courses (3 languages) ▢ YouTube Ministry ▢ Online Courses ▢ Theological Correspondence Courses (2 languages) ▢ Church Planting ▢ Nehemiah Bible Colleges ▢ Gospel Printing Press ▢ Great Commission Partners ▢ St. Paul's Matriculation School ▢ Crusades ▢ Community Development

व्यवस्थापकीय कर्मचारी हे सर्व आपल्या राष्ट्राच्या आध्यात्मिक संजीवनीकरीता आणि आमच्या सेवाकार्याच्या सतत वाढीकरीता मनापासून प्रार्थना करीत आहेत. या प्रार्थना सेवाकार्यात सहभागी होण्यासाठी आम्ही आपले मन:पूर्वक स्वागत करतो.



*उपवास प्रार्थनेची टीम.*

२०२५ या वर्षभरात तुमच्या विश्वासू प्रार्थना, मासिक आर्थिक मदत आणि उदारपणे दिलेल्या विशेष दानांसाठी आम्ही मनापासून आभारी आहोत. सेवाकार्यातील तुमची सहभागिता आमच्यासाठी मोठ्या आशीर्वादाची ठरली आहे. आगामी दिवसांतही आपण आपल्या प्रार्थना आणि ठाम पाठिंबा असाच सुरू ठेवावा, असे आम्ही आपल्याला उत्तेजित करतो.

या आनंदमय ऋतूतील हा उत्सव साजरा करताना, आम्ही आपणा सर्वांना मंगलमय **ख्रिसमसच्या** आणि **नवीन वर्ष २०२६** च्या हार्दिक शुभेच्छा देतो.

आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताची कृपा तुम्हां सर्वांबरोबर राहो.

येशू ख्रिस्तामधील तुमचा सेवक,
**पास्टर एस्. सॅम सेल्व राज,**
E.mail: sam@echoofhiscall.org


(पान १ वरुन...)

**"ते राष्ट्रांना प्रकटीकरणासाठी उजेड....."** (लूक २:३२).

येशू ख्रिस्ताने स्वतः घोषित केले: **"मी जगात आहे तोपर्यंत मी जगाचा प्रकाश आहे"** (योहान ९:५). म्हणून ख्रिसमस हा त्या महान प्रकाशाचा उत्सव आहे.

या प्रकाशाबद्दल पवित्र शास्त्र काय म्हणते ते पाहूया: **"आणि पृथ्वी उजाड व अस्ताव्यस्त होती; आणि जलाशयावर अंधार होता; आणि देवाचा आत्मा जलावर हालत राहिला"–** उत्पत्ती १:२. सुरुवातीपासूनच अंधकाराने पृथ्वी झाकलेली होती, तरीदेखील अस्पर्शित आणि अढळ असा देवाचा आत्मा तिच्या वर हालत होता.

**"आणि तो प्रकाश अंधारात प्रकाशतो, आणि अंधाराने त्याला घेतले नाही."** (योहान १:५).



*प्रकाशापासून पळून जाणारा अंधार.*

### १. प्रकाश पापाच्या अंधकारातूनही चमकतो!

पापाने मानवजातीला देवापासून वेगळे केले. सर्वजण त्याच्या गौरवापासून उणे पडले आहेत. निर्मितीचा मूळ उद्देश्य हा देव आणि मानव यांच्यातील संगती होता, मात्र ती एदेनच्या बागेत खंडित झाला, आणि त्यामुळे देव व मानव यांच्या मध्ये एक मोठी दरी निर्माण झाली.

कितीही प्राण्यांच्या बलिदानाने खरोखरच आपल्या पापाचे प्रायश्चित्त होऊ शकले नाही. फक्त देवाच्या निष्कलंक कोकराचे, येशू ख्रिस्ताचे येणे आणि बलिदानच आपल्याला पित्याशी पुन्हा समेट घडवू शकले.

पापामुळे तुटलेले नाते पुन्हा पूर्ववत करण्यासाठी व देवाशी आपला समेट घडवून आणण्यासाठी येशू या जगात आला. त्याच्या अमूल्य रक्ताद्वारे, आता आपल्याला देवासमोर निर्भयपणे आणि नि:संकोचपणे येण्याचा विशेष अधिकार मिळाला आहे.

सैतानाने खोट्या कल्पना आणि सांसारिक विचलित करणाऱ्या गोष्टींद्वारे अनेकांची मने आंधळी केली आहेत. या आत्मिक अंधकारातून मार्ग काढण्यासाठी आपल्याला देवाच्या प्रकाशाची गरज आहे. जग ज्या अनेक गोष्टींना साधारण असे समजते, त्या प्रत्यक्षात देवाच्या सत्याच्या विरोधात आहेत.

### इतर भाषांतरांमध्ये हे सुंदर रीतीने व्यक्त केलेले आहे!

**"अंधकार कधीही त्या प्रकाशाला विझवू शकत नाही."** (NLT)

**"अंधकाराने त्या प्रकाशाला जाणले नाही."** (KJV)

**"अंधाराने त्याला समजले नाही किंवा त्यावर मात केली नाही."** (-MP)

जिथे जिथे प्रकाश प्रकाशतो, तिथे तिथे अंधार नाहीसा होतो. दोघांमध्ये कोणताही संघर्ष होत नाही, मात्र प्रकाश नेहमीच जिंकतो.

## अत्यंत महत्त्वाची सुचना!




नजीकच्या भविष्यात **एको ऑफ हिज कॉल**च्या पोस्टल डिस्पॅचमध्ये अपरिहार्य व्यत्यय येऊ शकतात. जर आपल्याला कोणताही व्यत्यय न येता **एको ऑफ हिज कॉल** प्राप्त करणे सुरू ठेवायचे असेल तर कृपया आम्हाला आपले नाव, पत्ता, ईमेल आणि व्हॉट्स एप नंबर याची माहिती पत्राद्वारे, ईमेल, फोन कॉल किंवा एस एम एस/व्हॉट्स एप संदेशाद्वारे तावडतोब पाठवा.

तुमच्या पाठिंब्यामुळे आम्हाला तुमची चांगली सेवा करण्यास मदत होते!

**आमचा पत्ता:**
**एको ऑफ हीज कॉल**
**१०, मोहम्मद अब्दुल्ला २ री गल्ली, चेपॉक, चेन्नई-६००००५, भारत**
**Cell: (+91) 98412 71858 / 98410 71858 E.mail: sam@echoofhiscall.org**



*आपल्याला देवाच्या प्रकाशाची गरज आहे.*

प्रभूने आपल्या अंत:करणात त्याचा प्रकाश चमकवावा, व जे काही आपल्या आणि त्याच्या दरम्यान अडथळा ठरत आहे ते उघड करावे, जेणेकरून आपण त्याच्याबरोबर पुनर्स्थापित संगतीत चालू शकू.

## २. प्रकाश अंधकारात चमकतो!

जिथे जिथे आपण पाहतो, तिथे तिथे अंधकार दिसतो – युद्धे, गरिबी, भ्रष्टाचार, अपराध, द्वेष आणि नैतिक अध:पतन. तरुण मंडळी निराशेच्या गर्तेत आहेत; काही तर आपले जीवनसुद्धा संपवत आहेत. समाज पापाचे गौरव करते आणि धर्मीपणाचा उपहास करते. असे वाटते की, दिवसागणिक जग आणखी अंधकारमय होत आहे.

आपण अनेकदा लोकांना म्हणताना ऐकतो, ''आपल्या काळात गोष्टी वेगळ्या होत्या.'' शिक्षण, तंत्रज्ञान आणि चिकित्सा यांनी अनेक दरवाजे उघडले खरे, मात्र त्यापैकी सर्वच देवाकडून आलेले नाहीत.

पवित्र शास्त्र आपल्याला या अंतिम काळाबाबत सावध करते: ''.... **शेवटल्या दिवसांमध्ये संकटाचे समय येतील. कारण माणसे स्वार्थबुद्धी, धनलोभी, बढाईखोर, गर्विष्ठ, निंदक, आईबापांस न मानणारी, अनुपकारी, अपवित्र, ममताहीन, असमाधानी, चहाड, इंद्रियदमन न करणारी, निर्दय, चांगल्याचा अनादर करणारी, विश्वासघातकी, हूड, गर्वाने फुगलेली, देवावर प्रीती करण्यापेक्षा विलासाची आवड धरणारी, सुभक्तीचे रूप आपल्यात आहे असे दाखवून तिचे सामर्थ्य नाकारणारी अशी होतील; तर अशांपासून दूर राहा**'' –२ तीमथ्य ३:१– ५.

या नैतिक पतनाचे वर्णन केल्यानंतर, पौल पुढे म्हणतो, ''अशांपासून दूर राहा.''

जरी जग अंधकारमय झाले तरी, देवाच्या गौरवासाठी तुम्ही प्रकाश झळकवत राहायला हवे!

**''येथे जे लोक अंधारात बसले होते त्यांनी मोठा प्रकाश पाहिला, आणि जे मरणाच्या प्रदेशात व छायेत बसले होते त्यांच्यावर प्रकाश उगवला''** – मत्तय ४:१६.



*जे लोक अंधारात बसले होते त्यांनी मोठा प्रकाश पाहिला.*

या ख्रिसमसच्या काळात, मी देवाला प्रार्थना करतो की, तो प्रत्येक अंधारातून प्रकाश टाको – केवळ या जगातच नाही तर आपल्या कुटुंबात, आपल्या वैयक्तिक जीवनात आणि आपल्या कामाच्या ठिकाणीही. त्याने घोषित करावे की, तोच आपल्या जगाचा प्रकाश आहे – आपल्या घरांमध्ये, आपल्या मुलांमध्ये, आपल्या विवाहांत, शिक्षणात, आरोग्यात आणि आर्थिक जीवनात सुद्धा.

डॉक्टर, नातेवाईक, नेते मंडळी किंवा अधिकारी यांच्यापैकी कोणाकडूनही आपल्याविरुद्ध उच्चारलेले प्रत्येक नकारात्मक शब्द देवाच्या प्रकाशाने नष्ट व्हावेत!

नवीन वर्षात पदार्पण करीत असताना, आपण येशू ख्रिस्तामध्ये विश्वासाने आणि खरेपणाने चालूया.

**''कारण तू माझा दिवा लावशील; यहोवा माझा देव माझ्या अंधाराचा प्रकाश करील''** – स्तोत्र १८:२८.

## ३. प्रकाश भीतीतूनही चमकतो!

जेव्हा ख्रिस्ताच्या जन्माची सुवार्ता मेंढपाळांना सांगितली गेली, तेव्हा ते भयभीत झाले:

**''तेव्हा पाहा, प्रभूचा दूत त्यांच्याजवळ उभा राहिला, व प्रभूचे तेज त्यांच्यासभोवती प्रकाशले, आणि ते फार भ्याले. मग दूत त्यांना म्हणाला, भिऊ नका, कारण पाहा, जो मोठा आनंद सर्व लोकांस होणार आहे, त्याचे शुभवर्तमान मी तुम्हांस सांगतो''** लूक २:९–१०.

स्वर्गीय प्रकाश रात्रीच्या आकाशात चमकला तेव्हा त्यांना वाटलेली भीती कल्पना करा!

देवदूत गॅब्रिएल मरीयेसमोर प्रकट झाला तेव्हा तिलाही भीती वाटली होती: **''पण ती त्याच्या बोलण्यावरून फार घाबरली,...... तेव्हा दूताने तिला म्हटले, मरीये, भिऊ नको,.......''** – लूक १:२९–३०.



*मरीये, भिऊ नको,....*

भीती खरी असते, पण जेव्हा येशू ख्रिस्ताचा प्रकाश चमकतो, तेव्हा भीतीला पळून जावे लागते.

आपण देवाच्या दृष्टीने मूल्यवान आहोत. तर चला, आपली भीती बाजूला सारून मरीयासारखा प्रतिसाद देऊया:

**''.....पाहा, मी प्रभूची दासी, तुझ्या वचनाप्रमाणे मला होवो''**–(लूक १:३८).

(...पान ६ वर)

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

स्तुती आणि प्रार्थनेचे विषय - १९ डिसेंबर, २०२५ पासून ते १८ जानेवारी, २०२६

ओझी वाहणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

**(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)**

## याकरीता देवाची स्तुती करा...

**१९ डिसेंबर -** आमच्या भाषांतरकारांना, सहसंपादकांना, समन्वयकांना आणि त्यांच्या कुटुंबियांना देवाने आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

**२० डिसेंबर -** आमचे **सेंट पॉल्स मॅट्रिक्युलेशन स्कूल, नहेम्या बायबल कॉलेज,** आणि **थिऑलॉजिकल कॉरस्पॉन्डन्स कोर्स** हे सर्व संधीपासून वंचित असलेल्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी कार्यरत आहेत यासाठी देवाची स्तुती करा.

**२१ डिसेंबर -** देवाने आमच्या प्रार्थनेतील सहभागीदार, सदस्यता घेणारे सहभागीदार, विश्वासामधील सहभागीदार, जीवनभर सोबत करणारे सहभागीदार, आणि महान सेवाकार्याचे सहभागीदार आणि त्या सर्वांच्या कुटुंबियांवर असलेल्या देवाच्या दयेबद्दल देवाची स्तुती करा.

**२२ डिसेंबर -** आमच्या विविध सेवाकार्यातून ज्यांच्यापर्यंत पोहोचता येत नाही अशा आत्म्यांपर्यंत पोहोचण्यास देव आम्हांस मदत करतो यासाठी देवाची स्तुती करा.

**२३ डिसेंबर -** आपल्या सेवाकार्यातील कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना देवाने भरपूर आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

**२४ डिसेंबर -** आमच्या कामगारांच्या कुटुंबियांवर देवाने त्याच्या आशीर्वादांचा वर्षाव केला यासाठी देवाची स्तुती करा.

**२५ डिसेंबर -** या वर्षाच्या आमच्या सर्व ख्रिसमस उत्सवांना आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

**२६ डिसेंबर -** जगाचा तारणहार येशू ख्रिस्ताचा जन्म, जो आपल्या सर्वांना पापापासून मुक्त करण्यासाठी झाला यासाठी देवाची स्तुती करा.

**२७ डिसेंबर -** आमचे वरिष्ठ पाळक साहेब आणि त्यांच्या कुटुंबियांना देवाने त्याचे दैवी संरक्षण देऊन त्यांना सर्व प्रकारच्या दुष्ट शक्तींपासून जपले म्हणून देवाची स्तुती करा.

**२८ डिसेंबर -** आमच्या मुख्य मंडळीमध्ये आणि तिच्या शाखांमध्ये संडे स्कूलसाठी अधिकाधिक मुलांच्या उपस्थितीद्वारे देवाने त्यांना आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

**२९ डिसेंबर -** या संपूर्ण वर्षात देवाच्या सेवकांना देवाने त्याचे दैवी संरक्षण पुरवले यासाठी देवाची स्तुती करा.

**३० डिसेंबर -** या संपूर्ण वर्षभर देवाने ख्रिस्ती संस्थांचे कार्य सुरळीत आणि फलदायीपणे चालवले यासाठी देवाची स्तुती करा.

**३१ डिसेंबर -** वर्ष २०२५ साठी आमच्या सर्व गरजा चमत्कारिक रीतीने आम्ही पूर्ण करू शकलो यासाठी देवाची स्तुती करा.

**०१ जानेवारी-** नवीन वर्ष २०२६ साठी जगभरातील सर्व वाचकांना आणि लोकांना शांतीच्या शुभेच्छा लाभावी यासाठी देवाची स्तुती करा.

**०२ जानेवारी-** देवाने आमच्या मुख्य तसेच शाखीय मंडळ्यांना अधिक विश्वासणाऱ्यांना जोडले या आशिर्वादाबद्दल देवाची स्तुती करा.

**०३ जानेवारी-** २०२६ साठी सर्व मंडळ्या आणि त्यांच्या विश्वासणाऱ्यांना देव त्याच्या आशीर्वादित अभिवचनांनी आशीर्वादित करीत आहे यासाठी देवाची स्तुती करा.

## कृपया यासाठी प्रार्थना करा...

**०४ जानेवारी-** आमचे कन्नड भाषेतील सहाय्यक संपादक रेव्हरंड आर. रामकृष्ण व त्यांची पत्नी यांचे अलीकडच्या आजारातून लवकर बरे व्हावे यासाठी प्रार्थना करा.

**०५ जानेवारी-** जगभरातील नेते दैवी ज्ञानाने परिपूर्ण व्हावे आणि लोकांच्या कल्याणासाठी त्यांनी कार्य करावे यासाठी प्रार्थना करा.

**०६ जानेवारी-** आमच्या **सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूल** आणि **नहेम्या बायबल कॉलेज**मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे देवाने संरक्षण करावे यासाठी प्रार्थना करा.

**०७ जानेवारी-** आमच्या संस्थेसाठी योग्य कर्मचारी मिळावे यासाठी प्रार्थना करा.

**०८ जानेवारी-** ख्रिस्ती लोकांनी देवाचे वचन पाळावे आणि ख्रिस्तासारखा स्वभाव प्रदर्शित करावा यासाठी प्रार्थना करा.

**०९ जानेवारी-** या महिन्यातील आपल्या गरजांसाठी देवाने तरतूद करावी यासाठी प्रार्थना करा.

**१० जानेवारी-** आमच्या सेवाकार्यातील सहकारी आणि राज्य समन्वयक हे त्यांच्या कार्यात यशस्वी होवोत यासाठी प्रार्थना करा.

**११ जानेवारी-** आमच्या सेवाकार्यांचा विस्तार व्हावा आणि सुवार्तेचा संदेश संपूर्ण जगभर पसरवला जावा यासाठी प्रार्थना करा.

**१२ जानेवारी-** आमचे पाळक साहेब एस. सॅम सेल्व राज आणि त्यांच्या कुटुंबियांना देवाने वर्ष २०२६ मध्ये त्यांना त्याच्या समर्थ हाताखाली राखावे यासाठी प्रार्थना करा.

**१३ जानेवारी-** वाईट शक्तींपासून सर्व मंडळ्यांना देवाने संरक्षण द्यावे यासाठी प्रार्थना करा.

**१४ जानेवारी-** सर्व राष्ट्रांत शांतता नांदावी आणि त्यांचा आर्थिक विकास व्हावा यासाठी प्रार्थना करा.

**१५ जानेवारी-** जगभरातील सर्व ख्रिस्ती शैक्षणिक संस्थांची कीर्ती कायम राहावी यासाठी प्रार्थना करा.

**१६ जानेवारी-** सर्व मंडळ्या आणि ख्रिस्ती संस्थांची शासनाकडे कायदेशीररीत्या नोंदणी व्हावी यासाठी प्रार्थना करा.

**१७ जानेवारी-** देवाने आमच्या प्रार्थनेतील सहभागीदार, सदस्यता घेणारे सहभागीदार, विश्वासामधील सहभागीदार, जीवनभर सोबत करणारे सहभागीदार, आणि महान सेवाकार्याचे सहभागीदार आणि त्या सर्वांच्या कुटुंबियांवर देवाने आशीर्वादाचा हात ठेवावा यासाठी प्रार्थना करा.

**१८ जानेवारी-** २०२६ मध्ये जगभरात चांगले आरोग्य, शांती आणि समृद्धी नांदावी यासाठी प्रार्थना करा.

(पान ४ वरुन)

जेव्हा आपण देवाच्या अधिकारासमोर शरण जातो, तेव्हा त्याने दिलेले प्रत्येक अभिवचन पूर्ण होते.



*आपण देवाच्या अधिकाराला समर्पित होतो. त्याच्या प्रत्येक वचनाची पूर्तता होईल.*

भिऊ नका; सेनाधीश प्रभू तुमच्यापुढे चालतो. तोच तुमच्यासाठी लढेल.

येशू ख्रिस्ताला धरून राहा, तो सर्वकाही आहे. येशूचा अनुभव घ्या!

## ४. प्रकाश त्याच्या प्रकाशाने आपल्याला पुढच्या पावलांकरिता मार्ग दाखवतो!

आपल्याला भविष्याची भीती बाळगण्याची गरज नाही, कारण परमेश्वर आपला मार्गदर्शक प्रकाश आहे.

**"तुझे वचन माझ्या पायांस दीप व माझ्या वाटेला प्रकाश आहे"** - स्तोत्र ११९:१०५

देव आपल्याला संपूर्ण मार्ग एकदम दाखवत नाही, पण तो नेहमी पुढील पावलाचे मार्गदर्शन करतो.

जेव्हा गोंधळलेल्या अवस्थेत जीवनाचा मार्ग सापडत नाही, जेव्हा चोहोबाजूला अंधारच पसरलेला दिसतो, तेव्हा आपण स्वतःला विचारतो, परमेश्वरा, मीच का?,



*देव आपल्याला संपूर्ण मार्ग एकदम दाखवत नाही.*

तेव्हा दावीदाच्या वचनांची आठवण करा: **"कारण तू माझा दिवा लावशील; यहोवा माझा देव माझ्या अंधाराचा प्रकाश करील"** - स्तोत्र १८:२८.

नवीन वर्षात पदार्पण करीत असताना, आपल्या कुटुंबासाठी, सेवेसाठी आणि भविष्यासाठी देवाचे मार्गदर्शन शोधा.

भविष्य घडवणारा तोच आहे, म्हणून त्याच्याकडे मागा.

## यशयाच्या पुस्तकात देव आव्हान करीत आहे!

**"आणि माझ्यासारखा कोण सांगेल आणि हे प्रगट करील? आणि मी पुरातन लोक स्थापले तेव्हापासून कोण ते माझ्याकरिता क्रमाने मांडील? आणि ज्या गोष्टी घडत आहेत व पुढे ज्या घडतील त्या त्यांनी कळवाव्या"** - यशया ४४:७.

प्रिय मित्रांनो, २०२६ मध्ये प्रवेश करण्यापूर्वी, देवाने आपल्या जीवनावर, आपल्या मुलांवर आणि आपल्या उद्देशावर प्रकाश टाकावा व त्याच्या योजना प्रकट कराव्यात यासाठी त्याला विनंती करूया. तो आपल्याला पुढे काय आहे ते विश्वासूपणे दाखवील.

## ५. आपले संरक्षण आणि बचाव करण्यासाठी प्रकाश चमकतो!

**"अगे माझ्या वैरिणी, माझ्याविरुद्ध हर्ष करू नको; जेव्हा मी पडेन तेव्हा मी उठेन; जेव्हा मी अंधारात बसेन तेव्हा यहोवा मला उजेड होईल"** - मीखा ७:८.

किती सामर्थ्यशाली अभिवचन आहे हे! आपण जरी लज्जेमध्ये, निराशेमध्ये किंवा उदास होऊन बसलेले असलो, तरी आपण पुन्हा उठू, कारण परमेश्वर स्वतः आपला प्रकाश आहे.

कदाचित २०२५ हे तुमचं सर्वोत्तम वर्ष ठरलं नसेल, पण लक्षात ठेवा, देवाच्या मदतीने तुम्ही पुन्हा उठू शकता. तुम्ही काहीही गमावले असाल, तरी देव ते पुन्हा परत मिळवून देऊ शकतो, जर तुम्ही त्याच्याशी विश्वासू राहिलात तर.

जेव्हा इस्राएली लोक लाल समुद्रासमोर उभे होते, दोन्ही बाजूंना पर्वत आणि मागे फारोचे सैन्य होते, तेव्हा देवाची उपस्थिती त्यांचे रक्षण करण्यासाठी पुढे सरसावली: **"जेव्हा इस्राएली लोक लाल समुद्रासमोर उभे होते, दोन्ही बाजूंना पर्वत आणि मागे फारोचे सैन्य होते, तेव्हा देवाची उपस्थिती त्यांचे रक्षण करण्यासाठी पुढे सरसावली: मग देवाचा दूत जो इस्राएलाच्या गोटापुढे चालत होता तो निघून त्यांच्यामागे चालला, ....... आणि तो मिसराचा गोट व इस्राएलाचा गोट यांच्यामध्ये आला; आणि तो त्यांना ढग व काळोख होता, तरी तो यांना रात्री उजेड देत होता;........"** - निर्गम १४:१९-२०.

(पान ९ वर)

ECHO OF HIS CALL REACHING NATIONS SINCE 1959

# नहेम्या बायबल कॉलेजेस

शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक

चेपॉक आणि संतोषपुरम, वेलाचेरी, चेन्नाई

प्रवेशा करिता त्वरा करा! माध्यम : तामिळ (अर्धवेळ) हिंदी (निवासी) (स्पोन्सरशिप उपलब्ध)

ईश्वरविद्या डिप्लोमा & Bachelor of Theology

संपर्क : अध्यक्ष : नहेम्या बाईबल कॉलेज

आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५६ वर्षांपासून मान्यता प्राप्त

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

* ऑनलाईन क्लास उपलब्ध आहे *

## -: आमच्या मुख्यालयातील सेवाकार्या :-

१. प्रार्थना सेवा : २४ तास
२. **एको ऑफ हिज कॉल** : मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन
३. **बायबलकोर** : मुळभूत बायबल अभ्यासक्रम (इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी)
४. पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ
५. नहेम्या बायबल कॉलेज : (चेपॉक, संतोषपुरम आणि वेलाचेरी)
६. शाखा चर्च : संतोषपुरम, बालाजी नगर आणि वेलाचेरी
७. महान आज्ञापालनाचे भागीदार : (पाळकांचे नेटवर्क)
८. प्रशिक्षण कार्यक्रम : सेमिनार आणि रीट्रीटो
९. महासभा
१०. छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा
११. शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय : प्रकाशने
१२. सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल : गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल
१३. रवीवारी शब्बाथ शाळा : सकाळी १०.३० आणि सायंकाळी३ वाजता-रविवारी (चेपॉक, वेलाचेरी, बालाजी नगर आणि संतोषपुरम)
**१४. सकाळची उपासना : रविवारी सकाळी ५.३० वाजता**
**१५. सुरुवातीची उपासना : रविवारी सकाळी ८.०० वाजता**
**१६. तामिळ उपासना : रविवारी सकाळी ८.३० वाजता**
**१७. युवा सभा : रविवारी दुपारी ११.०० वाजता**
**१८. सहभाग भोजन : रविवारी दुपारी १.०० वाजता**
**१९. तेलगु उपासना : सायंकाळी ५ वाजता - रविवारी**
**२०. हिन्दी उपासना : सायंकाळी ४ वाजता - रविवारी**
**२१. तमिळ आणि इंग्रजी उपासना : सायंकाळी ६ वाजता - रविवारी**
२२. अभिप्रायाची वेळ : सायंकाळी ७.३० वाजता - रविवारी
२३. स्त्रियांची प्रार्थना : सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी
२४. पुरुषांची प्रार्थना : सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी
२५. शिष्यत्त्वाची सभा : सायंकाळी ६ वाजता - शनिवारी
२६. गृह प्रार्थना सभा : सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी
२७. विशेष प्रभु भोजन : पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी
२८. सेवाकाची समालोचन सभा : सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार
२९. पालकांची प्रार्थना : सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार
३०. रात्रभर प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शुक्रवार
३१. उपवास प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शनिवार
३२. पवित्र सहभागिता : दुसऱ्या रविवारच्या उपासनेत
३३. तरुण/तरुणी/लहान लेकरांसाठी प्रार्थना : दररोज रात्री १० वाजता (फोन द्वारा)
३४. कार्यालयीन स्टाफचे मनन : सकाळी ९ वाजता - दररोज
३५. कार्यालय : सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून)

## एको ऑफ हिज कॉल

### टपाल द्वारे धर्म शास्त्राचे अभ्यासक्रम

### केवळ भारतातील उमेदवारां करीता

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुवानिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. '**सर्टफिकेट इन मिनिस्ट्री**' प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

अध्यक्ष - नहेम्या बाईबल कॉलेज
एको ऑफ हिज कॉल, पोस्ट बॉक्स नं. २९५७,
चिपॉक, चैन्नई - ६०० ००५
फोन : (०४४) २८५२ ८२८२, २८५२ ९२९३,
फोन : ९८४१० ७१८५२, ९५६६१ ३१८५८
E-mail: biblecor@yahoo.co.in

## एको ऑफ हिज कॉल

### मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् अॅप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर ''**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**'' च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | |
|---|---|
| **Account Name** | **: ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST** |
| **Account Number** | **: 1023 2923 805** |
| **Bank Name** | **: STATE BANK OF INDIA** |
| **Branch** | **: TRIPLICANE, CHENNAI - 600 005** |
| **IFSC Code** | **: SBIN 0000249** |
| **SWIFT Code** | **: SBI NIN BB 455** |



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**''नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !'' (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

## गौरवशाली देव!

> ''दुखणाइतांना बरे करा, मेलेल्यांना उठवा, कुष्ठरोग्यांना निर्मळ करा, भुते काढून टाका; फुकटवारी तुम्हाला मिळाले, फुकट द्या''
> - मत्तय १०:८.

माझ्या सुरुवातीच्या काळापासूनच, देव माझ्या सेवकीय जीवनात महान चमत्कार आणि अद्भुत कार्य करीत आहे. माझ्या मर्यादपलीकडे, देवाने अत्यावश्यक काळात मला मदत करण्यासाठी आपल्या पवित्र देवदूतांना पाठवले. अनेक प्रसंगी मी देवाच्या सामर्थ्याचा साक्षीदार ठरलो; जेव्हा जेव्हा मी त्याला बोलवले, तेव्हा तेव्हा त्याचा मला नेहमीच अनुभव आला.

वर्ष १९९३ मध्ये, कोणीतरी मला फोन करून सांगितले की, रोज मेरी नावाची एक स्त्री, जी मद्रास (चेन्नई) शहरापासून सुमारे ३५ किलोमीटर अंतरावर राहत होती, व ती अनेक वर्षांपासून दुष्ट आत्म्याच्या हमल्याने आणि अधिनतेमुळे पीडित होती. यामुळे ती अन्नही खाऊ शकत नव्हती आणि झोपही घेऊ शकत नव्हती. ती आपल्या कुटुंबातील सदस्यांना वारंवार धमकी देत असे की, ती त्यांचे जीव घेईल. तिने अनेक वेळा आत्महत्या करण्याचाही प्रयत्न केला होता. तिच्यावरील नियंत्रणासाठी तिचे हातपाय बांधून तिला वेगळ्या खोलीत ठेवण्यात आले होते.

जेव्हा तिच्या कुटुंबातील सदस्यांनी मला तिच्या सुटकेसाठी प्रार्थना करण्यासाठी बोलावले, तेव्हा मी काही वेळ माझ्या व्यक्तिगत प्रार्थनेत घालवला, आत्मिक मार्गदर्शन घेतले आणि ते कुटुंब ज्या ठिकाणी राहत होते तिथे गेलो. मी माझ्या घरातून निघालो त्या क्षणापासूनच मला सैतानाकडून अडथळे निर्माण करणे जाणवत होते. त्या ठिकाणी पोहोचण्यापूर्वीच माझ्यावर शारीरिक आणि मानसिकरीत्या सैतानाने हल्ले केले.

मी त्या स्त्रीच्या घरात प्रवेश करताच, तिच्या कुटुंबीयांना तिचे हातपाय सोडून तिला मोकळे करावे असे सांगितले. तिला मोकळे करताच ती इकडेतिकडे पळू लागली, असभ्य भाषा बोलू लागली आणि माझ्यापासून पळून जाण्याचा प्रयत्न करू लागली. जरी मी प्रभू येशू ख्रिस्ताचा एक नवीन तरुण विश्वासी होतो, तरी प्रभूने मला त्या दुष्ट आत्म्याने ग्रस्त व्यक्तीचा सामना करण्यासाठी विशेष धैर्य आणि सामर्थ्य दिले.



प्रभू येशू ख्रिस्तावर पूर्ण विश्वास ठेवून, मी माझे तोंड उघडले आणि त्या स्त्रीतून दुष्ट आत्म्याने निघून जावे असा आदेश दिला. तेव्हा लगेचच ती स्त्री बेकाबु होऊ लागली, ती उड्या मारू लागली, छपराच्या तुळईला धरून बसली आणि आपल्या पायांनी लोकांवर हल्ला करण्याचा प्रयत्न करू लागली. कोणालाही तिला नियंत्रणात आणता आले नाही. माझ्या आजूबाजूला उभे असलेले लोक माझ्याकडे आश्चर्याने पाहत होते. परंतु मला माझ्यामध्ये प्रभू येशू ख्रिस्ताचे सामर्थ्य जाणवत होते आणि देव नक्कीच हस्तक्षेप करील याचा मला पूर्ण विश्वास होता.

शेवटी, मी पुन्हा माझे तोंड उघडले आणि सैतानाला आज्ञा दिली, ''सैताना, या स्त्रीला आता अधिक त्रास देण्याचा तुला काहीही अधिकार नाही. नासोरी येशू ख्रिस्ताच्या नावाने, मी तुला आज्ञा देतो तू या स्त्रीतून आत्ताच बाहेर निघून जा. येशू ख्रिस्ताच्या नावाने मी तुला आज्ञा देतो, तुझे तोंड बंद ठेव, लगेचच खाली ये आणि तात्काळ या स्त्रीतून बाहेर निघून जा.''

तत्क्षणी ती ओरडणे थांबवून जमिनीवर एखाद्या मृतदेहासारखी कोसळली. मग मी माझे हात तिच्या डोक्यावर ठेवले आणि प्रभूने तिला एक ताजे व नवीन जीवन द्यावे अशी विनंती केली. तत्क्षणी तिला शुद्ध आली आणि ती आश्चर्याने सगळ्यांकडे पाहू लागली. त्या क्षणापासून ती सैतानाच्या पंजातून पूर्णपणे मुक्त झाली आणि एक सामान्य ख्रिस्ती जीवन जगू लागली.

प्रिय वाचकहो,.........तो तुमच्या जीवनात कोणताही चमत्कार

करू शकतो. फक्त त्याचा स्वीकार करा; तुमचे पाप कबूल करा आणि त्याचे अनुसरण करा. प्रभूने मला जगाच्या अनेक भागांत नेले आहे आणि आपल्या वचनांची खात्री चिन्हे व चमत्कारांद्वारे करून दिली आहे. माझ्या मित्रा, तो तुझ्यावर अफाट प्रेम करतो. त्याला तू हवा आहेस. देव तुला आशिर्वादित करो.



*************

(पान ६ वरुन)



*तो त्यांना ढग व काळोख होता, तरी तो यांना रात्री उजेड देत होता.*

देव आपल्या लोकांमध्ये आणि त्यांच्या शत्रूंमध्ये उभा राहिला आणि अग्नीच्या स्तंभाद्वारे प्रकाश आणि संरक्षण दोन्ही दिले.

देवाचे लोक सुरक्षित होईपर्यंत, रात्रभर प्रकाश देऊन देव त्यांचे फारोच्या सैन्यापासून संरक्षण आणि बचाव करीत होता.

प्रिय भावांनो व बहिणींनो, परमेश्वर तुमच्यापुढे चालत आहे; तो तुमचे तिरकस मार्ग सरळ करील. जर त्याला तुमच्या मागे चालावे लागले, तर तो चालेलच.

या सत्याला अधोरेखित करणारी एक सुंदर यहूदी कथा आहे: एक वडील आणि त्यांचा लहान मुलगा एका निर्मनुष्य रस्त्यावरून चालत होते. जेव्हा एक चोर त्यांच्या समोर आला, तेव्हा वडिलांनी त्यांच्या मुलाला त्यांच्या संरक्षणासाठी मागे ओढले. नंतर जेव्हा मागून एक जंगली प्राणी आला, तेव्हा वडिलांनी आपल्या मुलाला पुढे सरकवले. जेव्हा दोन्ही बाजूंनी धोका निर्माण झाला, तेव्हा वडीलांनी आपल्या मुलाला खांद्यावर उचलून घेतले आणि त्याचा बचाव केला.



*तेव्हा वडिलांनी आपल्या मुलाला खांद्यावर उचलून घेतले आणि त्याचा बचाव केला.*

त्याचप्रमाणे, आपला स्वर्गीय पिता आपले रक्षण करतो. आपल्यापुढे कधी जायचे, आपल्या मागे कधी उभे राहायचे आणि आपल्याला कधी उचलून घ्यायचे हे त्याला माहीत असते.

देवाला तुमच्या लढाया लढू द्या; तो सेनाधीश परमेश्वर आहे!

## निष्कर्ष!

**प्रकाश चमकतो जेणेकरून आपण प्रकाशित व्हावे.**

देव आपला प्रकाश आहे, पण तो आपल्याला या अंधाऱ्या जगात प्रकाशवाहक होण्यासही पाचारण करतो.

"......... **ज्याने तुम्हांस अंधारातून आपल्या अद्भुत प्रकाशात बोलावले आहे**........" – १ पेत्र २:९. "**तसाच तुमचा उजेड माणसांपुढे प्रकाशो, यासाठी की त्यांनी तुमची चांगली कामे पाहावी, आणि तुमचा बाप जो आकाशात आहे त्याचे गौरव करावे**"– मत्तय ५:१६.



*तो आपल्याला या अंधार्या जगात प्रकाश वाहक होण्यास पाचारण करतो.*

आपल्या जीवनाद्वारे देवाच्या कृपेचे आणि सत्याचे प्रतिबिंब दिसावे. तुमच्या शब्दांपेक्षा तुमची कृती जास्त बोलावी. इतरांनी तुमच्या दयाळूपणात, कृतीत आणि नैतिकतेत ख्रिस्ताला पाहावे.

माझ्या प्रिय मित्रांनो, तुम्हाला कदाचित २०२६ मध्ये कोणत्या गोष्टी घडतील हे माहित नसेल, पण ज्याचा त्या सर्व गोष्टींवर नियंत्रण आहे त्याच्यावर तुम्ही विश्वास ठेवू शकता.

भिऊ नका. तुमच्या जीवनाच्या प्रत्येक भागातून देवाचा प्रकाश चमकू द्या.

उद्याची चिंता करू नका!

"...... **कारण उद्या आपली काळजी करील;**......." – मत्तय ६:३४.

आज तुमच्यावर कोणतेही ओझे असो, लक्षात ठेवा: येशू हा जगाचा प्रकाश आहे, जो प्रत्येक भय आणि जीवनातल्या अनिश्चिततेमधून आपला प्रकाश प्रकट करतो.

त्याचा प्रकाश तुमच्या अंधकारापेक्षा अधिक शक्तिशाली आहे, त्याची शांती तुमच्या संकटापेक्षा मोठी आहे, आणि त्याचे सामर्थ्य कोणत्याही विरोधापेक्षा अधिक आहे.

"**कारण जीवनाचा झरा तुझ्यापाशी आहे; तुझ्या प्रकाशाने आम्ही प्रकाश पाहू**" – स्तोत्र ३६:९.

*************

## सूचना

कृपया आमचे मोबाईल क्रमांक (+९१) ९८४१० ७१८५८, (+९१) ९८४१२७१८५८ (मुख्य क्रमांक) आपल्या मोबाईल फोनमध्ये जतन करून ठेवा.

– संपादक

Posted at "Egmore RMS Patrika Channel" RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/24-26 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/24-26

## Echo of His Call

**YouTube**
*Please subscribe*

Kindly view and subscribe our **Echo of His Call YouTube Channel** when you get time. Thanks.
- Editor

## OUR BANK DETAILS:

### *1. Bank : State Bank of India*

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **S. Sam Selva Raj**
A/C No. : **1023 2934 679**
IFSC : **SBIN 00 00 249**
SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

### *2. Bank : ICICI Bank*

Branch : **Anna Salai, Chennai-6**
Name : **Echo of His Call**
A/C No. : **6038 0502 2319**
IFSC : ICIC 000 6038

### *3. Bank : State Bank of India*

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **Echo of His Call Educational Trust**
A/C No. : **1023 2923 805**
IFSC : **SBIN 00 00 249**

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**
*****
**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य, गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-   आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाउन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.org

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/24-26
WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/24-26
Date of Publication: Second week of every month
Date of Posting : 11th & 12th of every month
Posted at "Egmore RMS Patrika Channel"
on 12th DECEMBER 2025.
If un-delivered please return to:
ECHO OF HIS CALL (MARATHI)
P.O. Box No. 2957,
Chepauk, Chennai - 600 005, INDIA.
Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766

*JESUS LOVES YOU!*

To

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers,** New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**